REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# मराठी राजकीय कादंबरी आणि रवींद्र शोभणे

**डॉ. राजेंद्र ल. सलालकर**
विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोल्हार , ता. राहाता, जि. अहमनदगर.

## प्रस्तावनाः

।।१।।

रवींद्र शोभणे हे १९७५ नंतरच्या कालखंडातील महत्त्वाचे लेखक, कथा, कादंबरी आणि समीक्षा या प्रकारात आपल्या मूलगामी चिंतनपर लेखनाने त्यांनी मराठी साहित्यात विशेष ठसा उमटवला. 'वर्तमान' , 'दाही दिशा', 'शहामृग', 'तद्भव' 'अदृष्टाच्या वाटा', 'चंद्रोत्सव' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिध्द झाले असून, अनेक कथा विविध नियतकालांमधून प्रसिध्द झालेल्या आहेत. त्यांच्या कथांचे विषय वैविध्यपूर्ण आणि वर्तमान वास्तवाचा वेध घेता-घेता मानवी मनाचाही शोध घेणारे असतात. कथेबरोबरच त्यांनी विपूल असे समीक्षालेखनही केले आहे. 'कादंबरीकार श्री. ना पेंडसे', सत्व शोधाच्या दिशा' 'संदर्भासह' ही समीक्षणात्मक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. यातून साहित्य, संस्कृती, मानवेतिहासाचे आकलन आणि त्याची अन्वयार्थक पुनर्मांडणी यासंबंधीचे चिंतन असते.

कथा आणि समीक्षा लेखनाच्या तुलनेत त्यांचे कादंबरीलेखन अधिक भरदार आणि मराठी कादंबरी प्रवाहात ठसठशीत उठून दिसणारे आहे. म्हणूनच कादंबरीकार शोभणे हे बिरूद त्यांना अधिक शोभणारे आहे. 'प्रवाह', 'रक्तधृव' , 'कोंडी', 'चिरेबंद', 'सव्वीस दिवस', 'उत्तरायण', 'पडघम', 'पांढर', 'अश्वमेध', आणि 'पांढरे हत्ती' या त्यांच्या कादंबऱ्या मराठी कादंबरी प्रवाहाला अधिक प्रस्फूरीत करणाऱ्या आहेत. रामायण- महाभारतादी प्राचीन काव्याचा त्यांच्यावर विशेष प्रभाव दिसतो. तो केवळ रूढार्थाने नव्हे, तर त्या काव्याचे पुनर्वाचन करून वर्तमानकालीन मानवी जीवनातील गुंतागुतीचे अन्वयार्थ शोधण्याची आस त्यातून दिसते. या वाचनाच्या आकलन विश्लेषणाचे प्रतिध्वनी त्यांच्या सर्व लेखनातून दिसू लागतात. पण त्याचा अधिक प्रभाव त्यांच्या कादंबरी लेखनावर दिसतो. इतिहास, भूगोल, संस्कृती, तत्वज्ञान, राजकारण, समाजकारण, अध्यात्म याबद्दलचा अभ्यास, मानवी स्वभाव, मानवी नातेसंबंध, रूढी, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा आणि त्यातील गुंतागुंत उलगडून पाहण्याची ओढ त्यांच्या लेखनातून दिसते.

'माणूस' आणि 'समाज' ही विवक्षित आणि एकसंध एकके मानून त्यांच्या आतमध्ये आणि परस्परांमध्ये जे संवाद-विसंवाद घडतात, त्यांचे जे चलन-वलन चाललेले असते, त्यांचे ते सूक्ष्म निरीक्षण करतात. तो संवाद - विसंवाद कसा घडतो? का घडतो? त्याचे काय परिणाम दिसतात? हे समजून घेऊन, त्याचा काळाच्या पटावर आलेख मांडण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चाललेला आहे. त्यातून येणाऱ्या 'सर्वसाक्षी सर्वांभूती'च्या अनुभवाची प्रचिती विशेष त्यांच्या कादंबरीलेखनातून दिसते.




इतिहासातील घटनांचा वेध घेऊन त्याचा अन्वयार्थ लावणे हे साहित्याचे एक ध्येय असते. या प्रकारचे काम अनेक लेखक करीत असतात. परंतु विस्तृत काळाचा एकत्रित वेध घेण्यासाठी जी व्यापक दृष्टी लागते, मेहनत करण्याची आणि अभ्यास-चिंतन करण्यासाठी जी तयारी लागते. ती बहुदा काही अपवाद वगळता मराठी साहित्यात तरी विरळच दिसून येते. रवींद्र शोभणे ही कसर भरून काढण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते.

मराठी कादंबरी समजून घेताना सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, स्त्रीप्रधान, वास्तवात्मक, रंजनपर, बोधपर तिचे जे विविध प्रकार विचारात घेतले जातात त्यापैकीच 'राजकीय कादंबरी' होय. त्या दृष्टिकोनानुसार त्या-

त्या संहितेची तपासणी करणे ही यामागे भूमिका असते. त्यानुसारच 'राजकीय' असा दृष्टिकोन ठेवून कादंबरीचे आकलन विश्लेषण करणे म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. अर्थात एकादी कादंबरी राजकीय असली तरी तिच्यात सामाजिक, सांस्कृतिक जीवनदर्शन अनुत्सुत असते, हे विचारात घेतले, की जीवनातील विविधताही अनुषंगिक ठरते.

'राजकारण' ही काही स्वतंत्र व्यवस्था नाही. तो समाजजीवनातीलच एक भाग आहे. नव्हे तो दोन्हीचाही एकात्म भाव आहे. समाज प्रवाहीत राहण्यासाठी राजकारणाची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे कधी–कधी साहित्यात थेट राजकारणाची चर्चा होत नसली, तरी त्याचा प्रभाव आपण नाकारू शकत नाही. परंतु जेव्हा राजकीय प्रभावाचीच ज्या संहितेत मीमांसा केली असेल तेव्हा त्याची चर्चा अपरिहार्य ठरते. दोनपेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतात, तेव्हा सत्ता या संकल्पनेचा उदय होतो. यातील सांख्यिकी प्रमाण वाढत चालले की राजकारणाचा अपरिहार्य प्रभाव सुरू होतो.

'राजकारण' ही आधुनिक संकल्पना लोकशाही प्रधान व्यवस्थेत अधिक ठळकपणे दिसून येते. त्यामुळे राजकीय कादंबरीची संकल्पना स्वातंत्र्योत्तर काळातच अधिक विचारार्थ ठेवावी लागते. राजकीय प्रणाली, राजकीय व्यक्ती, पक्षीय विचारसरणी, राजकीय स्थित्यंतरे, सत्तेसाठी संघर्ष, सत्तेची अनिवार ओढ, राजकारणाच्या चौकटीतून तयार होणारे सामाजिक वास्तव, सत्तेसाठी आडवी येणारी व्यवस्था, मूल्यभाव, नीती संकेत, नियम आणि त्याच्या प्रभावाची आणि नकाराची मानवी कृती, त्यातून उद्भवणारे सामाजिक वास्तव हा राजकीय कादंबरीचा परीघ सांगता येईल.

स्वातंत्र्यपूर्व काळात माडखोलकरांची 'मुक्तात्मा' ना.सी. फडकेंची 'प्रवासी, आणि खांडेकराची 'कौंचवध' या काही निवडक कादंबऱ्या सांगता येतील. बदललेली राजकीय परिस्थिती या प्रमुख आशय सूत्राभावेती विणलेली वसंत वरखडेकरांची 'प्रतिनिधी' आणि ग.प्र.प्रधान याची 'साता उत्तराची कहाणी' या कादंबरीतून राजकीय घटनांना प्राधान्य देऊन चित्रण केलेले दिसेल. स्वातंत्र्योत्तर काळात 'ताम्रपट', दिवे गेलेल दिवस (रंगनाथ पठारे), डोंबाऱ्याचा खेळ (भाऊ पाध्ये), डोंगर म्हातारा झाला (अनिल थत्ते), एन काऊण्टर (एकनाथ साळवे), 'झाडाझडती' (विश्वास पाटील), आंदोलन (दिनानाथ मनोहर) आणि मुंबई दिनांक, सिंहासन, तडजोड (अरूण साधू) या प्रमुख राजकीय कादंबऱ्याचा उल्लेख करता येईल.

मराठीत खऱ्या अर्थाने राजकीय कादंबरी समृध्द केली ती अरूण साधू यांनी. साधू पत्रकारीतेच्या निमित्ताने मुंबईत दीर्घकाळ राहिल्याने, त्यांना सत्तेचे शीर्षस्थान अधिक जवळून पाहता आले. त्याचा त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून अत्यंत लिलया उपयोग केला. अर्थात साधूची राजकीय कादंबरीलेखन हे प्रामुख्याने थेट सत्तेतील सहभागी व्यक्तिरेखांचे आहे. राजकीय घटना घडामोडीचा समाजावर होणारा परिणाम आणि अशा समाज वास्तवाचा वेध त्यातून घेतला जातच नाही असे नाही, पण तो त्यांचा प्रधान हेतू नाही. साधूंनी सत्तेच्या शीर्षस्थानावरील राजकीय घडोमोडींचा आणि डावपेचाचा वेध घेतला.

शोभणेंची कादंबरी राजकीय घडामोडीबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, मानवीमूल्य अशा अनुषंगाने वेध घेते. राजकारण हा समाजाचाच एक भाग असून तो समाजाच्या इतर सर्व क्षेत्रावर प्रभाव पाडतो. राजकीय घडोमोडींबरोबरच त्याच्या सामाजिक परिणामांचाही पट महत्त्वाचा असतो. समाज हा राजकीय सत्ताधीशांच्या निर्णयाच्या प्रभावाखाली वावरत असतो, हे वास्तव शोभणे अधिक अधोरेखित करतात. शोभणेच्या कादंबरीचे आकलन या दृष्टीने करणे अधिक महत्त्वाचे ठरेल. शोभणेंनी १९७५ नंतरच्या सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक परिवर्तनाचा त्रिखंडात्मक कादंबरीद्वारे वेघ घेण्याचा संकल्प सोडला आहे. 'पघडम' (१९७५ – १९८४), आणि 'अश्वमेध' (१९८४–१९९१) या दोन बृहत कादंबऱ्या त्याचाच भाग. त्यापुढील 'होळी' ही कादंबरी यथावकाश येईल. परंतु या थांब्यावरील त्यांचे चिंतन समजून घेणे महत्त्वाचे आहे. या दोन्ही कादंबऱ्यातून रविंद्र शोभणे यांनी ७५ ते ९१ पर्यंतचा विस्तृत कालपट मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वस्तुत: या दोन कादंबऱ्या साहित्यस्मृती म्हणून स्वतंत्र असल्यातरी, आशयात्मक दृष्टीने एकच आहे. त्यामुळे त्यांचा स्वतंत्र विचार करता येत नाही तो एकत्रितपणेच करावा लागतो.

।।२।।

'पडघम' मध्ये आणीबाणी, इंदिराजीचा पराभव, अल्पकालीन जनता सरकार, पुन्हा इंदिरा विजय, बांगला मुक्ती संग्राम, पाकिस्तान युध्द , खलीस्तान संघर्ष, सुवर्ण मदिरातील लष्कर कारवाई आणि त्यानंतर इंदिराजीची हत्या या घटना आहेत. १९७५ नंतरचा काळ हा राष्ट्रीय आणि राज्यपातळीवरही अनेक घडामोडींनी भरलेला आहे. इंदिरा आणि राजीव गांधी यांची हत्या ही या काळातील अत्यंत विदारक , देशाला हादरवून टाकणारी आणि अमानवीय घटना. अनेक वर्षाच्या लढाईनंतर १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्य आदोलनावर म. गांधींच्या विचारांचा प्रभाव होता. पंडित जवाहरलाल नेहरू, लाल बहादूर शास्त्री या उदारमतवादी आणि राष्ट्रहितवादी नेत्यांनी हे स्वातंत्र्य जपण्याचा प्रयत्न केला. इंदिरा गांधीनीही हाच विचार पुढे नेला. प्रसंगी खलिस्तानवादी प्रवृत्तीला ठेचून काढण्यासाठी सुवर्णमंदिरात सैन्य घुसवण्यासही त्यांनी मागे–पुढे पाहिले नाही. त्यामुळेच धर्मांध लोक इंदिराजींच्या विरोधात उभे राहिले. पण त्यांनी राष्ट्रहिताशी तडजोड केली नाही. त्याचाच परिणाम म्हणजे त्यांना बलिदान द्यावे लागले. 'गुंगी गुडिया' म्हणून संभावना केली जाणाऱ्या इंदिराबाई पुढे प्रखर राष्ट्रवादी नेत्या म्हणून तळपतात. वीस कलमी कार्यक्रम, गरिबी हटाव नारा यामुळे जनसामन्यांमध्ये प्रतिष्ठा पावलेली आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही भारताला

कणखरपणे उभे करणारी नेता म्हणून इंदिराबाई उदयाला आल्या होत्या. त्याचवेळी जयप्रकाश नारायण यांनी त्याच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारून देशात अशांतता आणि अराजकता निर्माण केल्याचे इंदिरा गांधींना वाटते. 'जनता आ रही है, सिंहासन खाली करो।'' विरोधकांच्या या बुलंद आवाजाने इंदिराबाई कमालीच्या संतप्त होतात. शेवटी परिस्थिती हाताबाहेर जाईल, असे वाटून देशात आणीबाणी घोषित केली जाते. नव्या घडामोडींचे ते पडघम ठरतात.

आणीबाणी लागू झाल्यानंतर सर्व सत्ता इंदिराजींच्या हाती एकवटते. त्याचा उपयोग त्या राजकीय विरोधकांना नामोहरम करण्यासाठी करतात. अनेक नेत्यांना तुरूंगात डांबले जाते. वर्तमानपत्रांवर नियंत्रण येऊन, त्यांना सरकारच्या भूमिंकाचे समर्थन करण्याची सक्ती केली जाते. तर तो विरोधकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच वाटतो. दै. भारती सारख्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र असलेल्या वर्तमानपत्रावर पोलीसांची करडी नजर राहते. व्यक्तीस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारी आणीबाणी प्रामुख्याने मध्यमवर्गीयांना खटकणारी असते. सामान्य जनतेला मात्र याचे घेणे देणे नाही. त्यातच इंदिरा गांधीनी गरिबी हटाव भूमिकेने गरिबांची सहानुभूती मिळवलेलीच होती. मध्यमवर्गीयांना त्यापेक्षा स्वातंत्र्यावरील बंधने महत्त्वाची वाटत होती. हा वर्ग मूठभर असला, तरी माध्यमे त्यांच्या हाती असल्याने त्याचीच चर्चा अधिक झाली हा भाग वेगळा. मध्यमवर्ग असा विरोधात उभा ठाकला असताना, सामान्य वर्ग आपल्या पाठीशी असावा असे इंदिराबाईंना वाटत होते. विरोधकांनी 'इंदिरा हटाव' असा जो नारा दिला होता, त्याचा प्रतिवाद करण्यासाठी इंदिराबाईंनी 'गरिबी हटाव' चा नारा दिला. यात इंदिराही हटली नाही आणि गरिबीही . परंतु राजकारणाचा सारिपाट चांगलाच रंगला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि काँग्रेस हे स्वातंत्र्यापूर्वीपासून एकमेकांच्या विरोधात उभ्या असलेल्या विचारसरणी. काँग्रेसचा धर्मनिरपेक्षतावाद आणि संघाचा राष्ट्रवाद हिंदू-राष्ट्रवाद. काँग्रेस बेगडी धर्मनिरपेक्षता बाळगतो आणि हिंदुचे तुष्टीकरण करून, मुस्लिमांचा अनुनय करतो असे संघाला वाटते. तर संघ अतिरेकी हिंदु राष्ट्रवादाचा आग्रह धरीत असल्याने अल्पसंख्यांकांना असुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण करतो, असे काँग्रेसला वाटते. या दोन विचारांच्या समर्थनार्थ हे दोन्हीही विचार एकमेकांसमोर ठामपणे उभे आहेत. आणीबाणी लागू करण्यामागे काँग्रेसची हीच भूमिका आहे. विरोधकांना काबूत ठेवण्यासाठी इंदिराबाईंनी खेळलेली ती चाल आहे. त्याविरूध्द माध्यमात ओरड होत असेल, तर सामान्यांच्या कल्याणाची भूमिका घेऊन मूठभर विरोधकांना एकटे पाहण्याची ती खेळी आहे. अर्थात सामान्यांचे कल्याण होते की नाही, हाही भाग वेगळा आणि खरंच जनतेच्या स्वातंत्र्यावर बंधने आल्याने जगण्याची गळचेपी झाली हाही. परंतु राजकारण मात्र चरम सिमेपर्यंत पोहचले होते हे स्पष्ट.

देशाच्या राजकीय सारीपाटाच्या खेळामध्ये सरकार आणि विरोधकांच्या भूमिका एकमेकांसमोर असतानाच त्याच्या दरम्यान अनेक ठिकाणी विरोधाभासी चित्र असते. पत्रकारितेच्या मूलभूत तत्वांशी प्रतारणा निषिध्द मानली जात नाही. राष्ट्रहीत, समाजहीत या बाबी गौण ठरून व्यवसाय महत्तवाचा ठरतो. त्यासाठी व्यवस्थेची भलामण करून, सत्तेच्या वळचणीला आश्रय शोधला जातो. दै. भारती सारखी वर्तमानपत्रे स्वातंत्र्याचा विचार प्रमाण मानून सरकार विरोधात उभे राहतात. पण ती विरोधकांचे मुखपत्र आहे असा वहीम ठेवून त्यांच्यावर नियंत्रण ठेवले जाते आणि दै. 'जनमन'ला मोकळीक दिली जाते. वर्तमानपत्रांचे असे दुभंगलेपण आणि मुलभूत तत्वाचा होणारा संकोच हे या काळाचे विशेष

प्रदीर्घ कालखंडाचे वास्तव चित्र मांडताना वास्तवातील घटना, प्रसंग आणि व्यक्तींचे थेट वर्णन करण्यासाठी वास्तव आणि कल्पनेचा बेमालून मेळ साधला गेलाय. भानुदास धवणे. अर्जून वाघ, अनंत देशपांडे, मृणाल देशपांडे, आण्णाजी देशमुख, नागनाथ देशमुख, नारायणराव यावलकर, कांतीलाल जयस्वाल, गायत्री गरूड, हेमा यावलकर, राजन जावळे या आणि इतर अनेक व्यक्तीरेखा या काल्पनिक आहे. याशिवाय इंदिरा गांधी, शरद पवार, राजीव गांधी, व्ही.पी.सींग, चंद्रशेखर, शंकरराव चव्हाण. शिवाजीराव निलंगेकर, वसंतदादा पाटील यांचेही कादंबरीच्या संहितेच थेट संदर्भ येतात. यामुळे कादंबरीच्या आयसूत्राला अधिक भक्कम आधार मिळतो. ती काळाच्या प्रवाहाशी घट्ट बांधली जाते. त्यामुळे १९७५ आणि त्यानंतरचा मूळ इतिहासातील कालप्रवाह या विशाल कादंबरीच्या आशयातून प्रवाहीत झाल्याचा अनुभव येतो. त्याची विशालता आणि बारकावा याचा एकत्रित परिणाम स्थिमित करणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून साहित्याद्वारे स्वत:ला व्यक्त करता-करता अर्जून राजकारणाची वाट धरतो. तर भानुदास धवणे सारखा कलावंत शतकानुशतकाच्या दबलेल्या आवाजाला आणि स्वत:ला आरपार मोकळा करीत जातो. त्याच्या संवेदनांची दखल घेणारी प्रस्थापित व्यवस्थाही इथलीच आणि अर्जून वाघ सारख्या नवख्या दलित नेत्याची वासलात लावणारी व्यवस्थाही इथलीच. सांस्कृतिक सत्तेत जरी उपेक्षितांना स्वत:च्या प्रबळ आत्मप्रेरणांनी स्वत:ला सिध्द करता आले तरी राजकारणात मात्र प्रस्थापित व्यवस्था अर्जून वाघला मात देते. भानुदास साहित्य अकादमी पर्यंत पोहचलो. परंतु अर्जुनला महापौरपदाच्या पलिकडे जाता येत नाही. राजकीय सारीपाटामागे असलेली वर्ग व्यवस्था विचारात घ्यायला हवी.

आणीबाणीनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना तरूंगात डांबले जाते. त्यातलाच हरिहर पेंडसेही. तुरूंगातील पोलीसांच्या अनन्वीत अत्याचारामुळे त्याला नपुंसकत्व येते. अर्ध्या जीवनात गेलेले पौरूषत्व त्याला

आंतरबाह्य उद्ध्वला करणारे आहेच, खेरीज पत्नीची होणारी कुचंबनाही त्याला सहन करावी लागते. शेवटी प्रभाकर मंगलमूर्तीशी नियोग करून हरिहरची बायको (सरला) एक अपत्यप्राप्ती करून घेते खरी पण तेही विकृत निपजते. त्यामुळे त्याच्या वैवाहिक जीवनाची शोकांतिका अधिक भेसूर बनते. पत्रकारितेची मूल्ये प्रमाण मानून संपादकीय भूमिका घेणाऱ्या आवा शिरोळेचा आवाज दाबला जातो. व्यवसाय अधिक तेजीव आणण्यासाठी आणि त्याद्वारे राजकीय लाभ मिळवित काँग्रेससाठीची अनुकुल भूमिका दै. जनमनाची चलती सुरू करते. गजानन गद्रेसारखे संपादक त्यासाठी तत्पर. आणीबाणीला विरोध करणाऱ्या तरूणांनाही तुरूंगात डांबल्यामुळे त्यांचे भावी आयुष्यही प्रभावीत होते. श्रीनिवास मृणाल तुरूंगातून बाहेर आल्यानंतर दोघेही एकत्र राहण्याचा निर्णय घेतात. श्रीनिवास कम्युनिष्ट विचारांचा, तर मृणाल अ.भा. वि.प ची. पर्यायाने संघाच्या विचारांची. वैचारिक विरोधाचे हे लग्न होते खरे, पण ते तडीला जात नाही. श्रीनिवासला उपभोग हवा, मात्र त्यातून उद्भवणारे मूल नको. तर मृणाल मातृत्वासाठी आसुलेली. शेवटी दोघेही वेगळे होतात आणि विरूध्द दिशेने भरकटत राहतात. अनंतराव देशपांडे सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य असल्याने आदोलनात सक्रिय होता येत नाही. त्यामुळे मनातल्या मनात घुसमटत राहतात. आबा शिरोळे आणि अनंत देशपांडे एकाच विचारांचे. शेवटी दोघांनाही वाणप्रस्थाकडे प्रयाण करावे लागते.

आणीबाणीमुळे सर्व सत्ता इंदिराजींच्या हाती एकवटते खरी, पण मुलगा संजय गांधीच्या रूपाने ती सत्ताबाह्य केंद्रावरही अधिक तीव्र होते. इंदिराजींनी 'गरिबी हटाव'चा दिलेला नारा वास्तवात आणण्यासाठी गरिबीचे मूळ लोकसंख्या वाढीत असल्याचा सिध्दांत मांडला जातो. त्यासाठी घाऊक पध्दतीने पुरूष नसबंदी केली पाहिजे हे राष्ट्रीय धोरण. या राष्ट्रधोरणाचे अनुपालन सत्ताकेंद्राशी जवळीकता निर्माण करणारे. देशभर नसबंदीची शिबिरे आयोजित केली जातात. युवक काँग्रेसचे कार्यकर्ते अशा शिबिरासाठी माल पुरवण्याच्या कामात व्यस्त. हा माल देशातील दीन दुबळ्यांशिवाय कुठे असणार ? गरिबी हटवता हटवता गरिबच हटला जातोय, याकडे कोणाचेही लक्ष नाही. पण अरूण जाधवसारख्या तरूण कार्यकर्त्याला राजकारणाचा सारिपाट मोकळा होतो. शिवाय केतकी सोनक सारखी तरूणी उपभोगण्यासही उपलब्ध होते. तिच्या भावनांची होळी झाल्यानंतर तिला आत्महत्या करावी लागली असेल तर तो तिचा प्रश्न. त्यामुळे हे प्रकरण अंगलट येत असेल तर राजकीय हितसंबंधाचा वापर करून तिला मनोरूग्ण ठरवता येते. आणि आपला माथा उजळ राहतो.

आणीबाणीची समप्ती ही लोकशाहीतील काळ्यापर्वाची समप्ती. निवडणूकांची घोषणा, राजकीय सत्तेला परिक्षेसाठी सामोरे जाण्याची प्रक्रिया, लोकशाहीचा उत्सव, वाद-प्रतिवाद, मत मतांतरांचा गलबला, आरोप-प्रत्यारोपांची आतषबाजी, कार्यकाळाचा लेखाजोखा, त्यावर जनतेचा कौल, शेवटी इंदिराजींचा दारूण पराभव. एका अर्थी जनतेच्या न्यायालयात सरकार पराभूत. ज्या सरकारने (इंदिरा गांधी) लोककल्याणासाठी आणीबाणी घोषित केली होती, ती योग्य नव्हती हा जनतेचा निर्वाळा. त्यामुळे आणीबाणीला विरोध करणारे आपल्या भूमिकेचा विजय मानू लागले. पण तो हा असा अनपेक्षित विजय त्यांनाही पचवता आला नाही. निश्चित उद्दिष्ट नसलेले जनता पक्षाचं कडबोळ्याचं सरकार अल्पकालीन ठरलं. मोरारजी देसाई, गुलझारीलाल नंदा, चौधरी चरणसिंग, यशवंतराव चव्हाण अशा राष्ट्रीय नेत्यांचा उदय आणि अस्त. यांच्या नेतृत्वातील अपुरेपणातच इंदिराजींच्या पुनरूत्थाची बिजे पेरली गेली. आणि फिनिक्स पक्षाप्रमाणे इंदिरा गांधी राखेतून ऊंच आकाशात भरारी घेऊ लागल्या. कणखर नेतृत्वाभोवती देश पुन्हा उभा राहीला. खलिस्तान सारख्या फुटीरतावादी विचारांना याच नेतृत्वाने ठेचून काढले. पण त्यातच इंदिराजींच्या मृत्यूची बिजे रोवली गेली. एका पर्वाचा असा विदारक अंत.

या गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीवर अनपेक्षितपणे राष्ट्रीय राजकारणात राजीव गांधीचा प्रवेश होतो. मिळालेले स्वातंत्र्य जपणे, समता-बंधुभाव-सत्य- अहिंसा-मानवता या मूल्यांची जोपसना करणे, ही राजीव गांधीच्या समोर राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने मोठी आव्हाने होती. ती पेलवताना राजीव गांधी या काळाला कसे सामोरे गेले हा 'अश्वमेघ' कादंबरीचा आशय. याच काळात इंदिरा गांधीच्या बलिदानानंतर काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले. याचा अर्थ भारतीय जनता राजीव गांधीकडे मोठ्या अपेक्षेने पाहत होती. परंतु शहाबाने प्रकरणात त्यांनी घेतलेली कोलंटी उडी अनेकांना चक्रवणारी होती. तशी ती त्यांनाही अस्वस्थ करणारी. यांचे प्रायश्चित म्हणून राम मंदिराचे दरवाजे उघडण्यास त्यांनी परवानगी दिली. त्यातून राममंदिर आंदोलनाला आणखी गती मिळली. या धार्मिक द्विधृवात्मकतेच्या खेळातच बोफोर्स तोफा खरेदी प्रकरण, जनता दलाचे दरकार, व्ही.पी. सिंगचे पंतप्रधान होणे, मंडल आयोगाची घोषणा, भारतीय जनता पक्षाची स्थापना, अडवाणींची रथयात्रा, व्ही.पी.सिंग- चंद्रशेखर यांची अल्पकालीन सरकारे या राष्ट्रीय पातळीवरील घटना, तर सात -आठ वर्षातच वसंतदादा पाटील शिवाजीराव निलंगेकर, शंकरराव चव्हाण, शरद पवार असे चार मुख्यमंत्री महाराष्ट्राला पाहावे लागले. राष्ट्रीय आणि राज्यपातळवरही राजकीय अस्थिरतेचा हा काळ. आपल्या मुलीच्या गुणवाढ प्रकरणात शिवाजीराव विलंगेकरांना पायउतार व्हावे लागणे, मराठवाडा नामांतर आंदोलन चरणसिमेवर पोहचणे आणि त्यातून उद्भवणारा जातीय तणाव नवी सामाजिक समीकरणे घडवीत होता. अश्वमेध कादंबरीचा हा सारा पार्श्वभाग.

।। ३।।

या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा विशेष लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. शोभणे यांनी स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यांच्या अस्तित्वाचे आतंरबाह्य जे कंगोरे चित्रित केले आहेत ते अधिक महत्त्वाचे.स्वातंत्र्याची चळवळ सुरू होऊन पुष्कळ दिवस झाले असले, तरी स्त्रीला अजुनही 'पुरुषी' व्यवस्थेतून बाहेर पडता आलेले नाही त्यामुळे सर्वच स्त्रियांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष या व्यवस्थेचे चटके सहन करावे लागतात. शोभणे यांनी स्वातंत्र्यानंतरच्या या स्थिती-गतीचा अत्यंत बारकाईने वेध घेतलाय. इंदिरा गांधी ते गोदाबाई या दोन टोकांमध्ये स्त्रीजीवनाचे कितीतरी आयाम या दोन्ही कादंबरीत आहेत. प्रेरणाताई, प्रमिलादेवी, कांचन आणि अमृता या सरंजामी व्यवस्थेतल्या स्त्रिया. या व्यवस्थेचे वहन करण्यात गढून गेलल्या. त्यांच्यापुढचे प्रश्न हे प्रामुख्याने पारंपरिक आणि पुरूषी व्यवस्थेतील. प्रेरणाताईंच्या मुलीचा संसार मोडलाय, तिचे दुसरे लग्न केले पाहिजे पण ती त्यासाठी तयार नाही, मुलीचे तारूण्य सुकत चाललेय, तिच्या जीवनाची वाट अडून पडलीयं त्यामुळे आजी होण्याचे त्यांना भाग्य मिळत नाही. एका बाजूला तिच्या शरीराची गरजही त्यांच्या लक्षात येते. त्याचवेळी हेमाचे विक्रम आणि राजन जावळेमध्ये गुंतणे त्यांना नातेसंबंधाविषयक गुंतागुंत निर्माण करणारे वाटते. एक स्त्री म्हणून तिची वेदना समजत असली, तरी आई म्हणून जी काळजी वाटते ती त्यांची ठणकणारी जागा. कांचनला मुलगी नसली, तरी मुलाच्या वागण्याने तिच्यापुढेही अनेक प्रश्न. मात्र ते सोडवण्याची तिची तऱ्हा ही पुरूषी. स्त्री सुलभ अशा किमान भावनाही तिच्यात नाहीत. एवढेच नव्हे तर आपल्या मुलाच्या कृत्याचे समर्थन करताना ती नवऱ्यापुढे खुद्द स्वत:चेच उदाहरण ठेवून, मुलाच्या तारूण्याच्या सोईसाठी ती चक्क शैला सारख्या एका निरागस मुलीचा बळी देण्यापर्यंत ती या व्यवस्थेत बुडाली आहे. आणखी महत्त्वाचे म्हणजे, आण्णाजी देशमुखांच्या उदात्त विचारांचीही तिला आठवण नाही. आण्णाच्या विचारांना पायदळी तुडवून पैसा आणि प्रतिष्ठा या नवजीवनातील मूल्यांच्या आहारी गेलेली ही स्त्री.

प्रमिलादेवींना तर आपला नवरा हा आपला म्हणण्यासाठीही जागा नाही. तरी तो आपला आहे असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. पुरूषांनी अनेक स्त्रियांशी संबंध ठेवले तरी चालतील पण त्याविषयी चकार शब्द न काढता पत्नी म्हणून राहावे, हा विचार त्यांनीही स्वीकारलेला. नानासाहेबांचा शेवट आणखी कोणाजवळ झाला असला, तरी आपण त्यांच्या लग्नाची पत्नी आहोत, हे मान्य करून राजकीय वारसा चालविण्यासाठी अधीर. तर अमृताही नव्या पिढीतील सरंजामी व्यवस्थेचीच वाहक. अरूणचे मृणालसारख्या स्त्रीशी संबंध असले, तरी हरकत नाही, फक्त त्यामुळे अरूणच्या राजकीय कारकीर्दीला धोका पोहचू नये ही तिला चिंता. नवरा आपला आहे, तो केवळ आपलाच असला पाहिजे हे महत्त्वाचे नसून, त्याच्या राजकीय भविष्याची चिंता करणारी अमृता याच पुरुषी विचारांचे वहन करणारी स्त्री.

गायत्री ही बंडखोर आणि पुरोगामी विचारांची असली, तरी तिला तिचे बंड पुरूषी व्यवस्थेपुढे म्यान करावे लागते. खरेतर तिला उच्च आणि संस्कारशील जीवनाचा वारसा. त्यामुळेच ती अधिक मोकळपणाने जीवनाकडे पाहू शकते. वडील उदारमतवादी असणे तिच्या व्यक्तिमत्त्वाला फुलण्यास मतदगार ठरणारे. जाती-पातीच्या पलीकडे जाऊन समानतेच्या पातळीवरून ती अर्जूनकडे ओढली जाते. त्याच्यात तिला सोज्वळ, मध्यमवर्गीय, समानधर्मा, समविचारी, सहानुभावशील, प्रेरक, कृतीशील नवरा दिसतो. तिला उत्तम संसार करायचाय. त्यातल्या भल्या-बुऱ्या अनुभवांना सामोरे जायचे. प्रेयसी, पत्नी मातृत्व या स्त्रीसुलभ भावनांचा अनुभव घ्यायचा आणि लेखक म्हणून स्वत:ला वाढवायचेही. परंतु विवाहानंतर तिचा अर्जूनकडून भ्रमनिरास होतो. स्वातंत्र्यानंतरच्या समाजजीवनातील अधिक पुढच्या दालनात तिला जायचे, मात्र अर्जून अजून मनाने मध्ययुगातच वावरतोय. हे तिला क्लेशदायक वास्तव सहन करावे लागते. शिवाय त्याला वर्तमानात आणायाचा ती प्रयत्नही करून पाहते. मात्र तो यायला तयार होत नाही. तेव्हा ती त्याच्यापासून वेगळं होण्याचा परंतु मनाविरूध्दचा निर्णय घेते. आपलं घर, संसार, जीवन उदध्वस्त होताना तिलाही वेदना होतात, परंतु यापेक्षा अधिक मागे जाण्याची आणि सरंजामी व्यवस्थेत स्वत:ला बसवून घेण्याची तिची तयारी नाही. खरा पेच तिच्यापुढे त्यानंतरच उभा राहतो. ती स्वतंत्रपणे जगण्याचा प्रयत्न करून पाहते. परंतु भोवतीची पुरूषी व्यवस्था अजूनही मध्ययुगातीलच. हा विदारक अनुभव नारायण जोशीच्या रूपाने तिला येतो. अर्जूनही याच व्यवस्थेतला पुरूष. थोडक्यात तिला पुरूषी व्यवस्थेतच राहावे लागणार आहे. फक्त बाहेर राहून असुरक्षित जीवन जगण्यापेक्षा पुन्हा अर्जूनसोबत राहून सुरक्षित जीवन का जगू नये? या विचारांपाशी ती येते आणि नाईलाजाने मागे फिरते. त्यामुळे केवळ स्त्रीनेच बदलून चालणार नाही, तर बाहेरची व्यवस्थाही बदलली पाहिजे, हे वास्तव तिच्यापुरते अधोरेखित होते. नोकरीच्या बदल्यात शरीर सुखाची मागणी करणारा नारायण जोशी आणि सुरक्षिततेच्या बदल्यात शरीरसुखाची मागणी करणारा अर्जून या दोघांमध्ये फक्त प्रमाणाचाच फरक राहतो. त्यामुळे अर्जून आणि नारायण जोशी हे या व्यवस्थेतील एकाच माळेतील मनी ठरतात.

भानुदासबरोबरच्या संसारात रमा रमली असली तरी समाधानी नाही. एका बाजूला नवरा प्राध्यापक. नावाजलेला लेखक. त्यामुळे मिळणारी प्रतिष्ठा भौतिक सुखाची उपलब्धता अशा बाह्य अर्थाने तिचा संसार सुखी. तरी पोटी पुत्र नसणे तिच्या संसाराची ठणकणारी वेदेना. तिला गर्भ राहतो, परंतु काही दिवसातच त्याचे निखळून पडणे तिला अधिक वेदना देणारे.

प्रा. संगिता काळभोर आणि प्रा. विजय वालदे यांना पगार सुरू झाल्यानंतर त्यांना आपला संसार मांडायचाय. परंतु उमेश जाधव या संस्थाचालकाकडून त्यांचे स्वप्न उद्ध्वस्त केले जाते. शासनाकडून आलेला पगार न मिळाल्यामुळे प्रा. विजय वालदे त्याविरूध्द आवाज उठवतो. तो दडपण्यासाठी उमेश जाधव त्याचा रस्ते अपघातात काटा काढतो. त्यामुळे पगारही नाही आणि नवराही नाही अशा दुहेरी संकटात संगिता सापडते. हाच उमेश जाधव तिच्याकडे शरीरसंबंधाचीही मागणी करतो. ज्याच्याबरोबर संसाराची स्वप्ने पाहिली होती, ती ज्याच्यामुळे उद्ध्वस्त झाली, तोच असा शरिराचा उपभोग घेतोय, हे संगिताला असह्य होते. विजयची हत्या ही तिच्या प्रियकराची आणि तिच्या मनाचीही हत्या ठरते. हे सारे असह्य घेऊन शेवटी संगीता आत्महत्या करते. ती (संगीता – स्त्री)आपल्याला हवी आहे. त्यासाठी प्रा. वालदे आडवा येत असेल तर त्याला संपवा. ती वस्तू मिळवा आणि मुक्तपणे भोगा. संगिताचा पराभव इथे होतो. आपण शिक्षित आहोत, आपल्याला आपल्या मनाप्रमाणे जगायचे, पण जगू दिले जात नाही असे असेल तर जगायचेच का? हा तिला पडलेला प्रश्न. हळुवार उमलू देणारा तिला पुरूष हवा आहे. कदाचित तो सर्वसामान्य आणि गरीब असेल, या जगातील सारी भौतिक सुखे देऊ शकणार नसेल पण तिच्या मनाला समजून घेणारा असेल ही तिची भावना. आपण एक वस्तू झालोय, आपल्याला कुणीतरी आपल्या मानविरूध्द भोगतंय त्यासाठी आपला बेदरकार वापर केला जातोय. या वेदेनेने ती जीवनाची अंतिम वाट धरते.

गोदाबाईची वेदना तर तिच्या अस्तित्वाशीच निगडीत. दारिद्र्यातील दुर्मुखलेलं अप्रतिष्ठित ओढग्रस्त जीवन. भानुदास हा मोठा मुलगा प्राध्यापक असणे, तेवढाच तिच्या जीवनातील आनंदाचा धागा. तोही शंकर आणि कुंदा या मुलीच्या विवंचनेने काळवंडलेला. एका बाजूला सामाजिक अप्रतिष्ठित दारिद्र्य, नवरा नसल्याचे दु:ख. दुसऱ्या बाजूला मुलांनीच नाकारलेले मातृत्व तरीही मुलांसाठी जगण्याची सक्ती हे गोदाबाईचे दु:ख. या पुरुषी व्यवस्थेत जगायचं तर तिडकेपाटील किंवा कांबळे गुरूजी असा कुठल्यातरी पुरूषाचा आधार हवाच, त्याशिवाय उगवला दिवस पुढे ढकलता येत नाही, हे पुरूष असलेल्या शंकर अथवा भानुदासलाही समजू नये?

हेमा, अनुपमा, शैला, शुभदा आणि मृणाल या याच व्यवस्थेत शोषल्या जात असलेल्या मुली. समजातील प्राथमिक पातळीवरुन अधिक वरच्या थरात प्रवेश करु इच्छित असलेल्या. त्यातील काही यापूर्वीच दाखल झालेल्या. परंतु या सर्वांची शोषणाची तऱ्हा एकच. हेमा ही खासदार कन्या, मोकळ्या वातावरणातील. मुलगी म्हणून कोणताही पारंपरिक दबाव नसलेली. त्यामुळेच ती स्वत:च्या जीवनाचा खंबीरपणे निर्णय घेऊ शकते. अजित सिन्हा हा ही व्यवस्थेतलाच पुरुष. त्याच्यात जे सरंजामी व्यवस्थेचे रक्त वाहते, त्यानुसार तो हेमाला आपल्या जीवनात स्थान देतो. परंतु हेमावर ते अन्याय करणारे. हेमाची स्वत:बदलची धारणा आणि अजित सिन्हांची स्त्रीबद्दलची जी धारणा आहे, त्यात महद्अंतर आहे. अजित अजूनही काळाच्या पुष्कळ मागे आहे. हेमाला आधुनिक जगातला पुरुष हवा आहे, तो विक्रमाच्या रुपाने तिला दिसू लागतो. पण तो या पुरुषी व्यवस्थेतला असल्याने तोही एकदा विवाहाने बाटलेल्या हेमाबरोबर पुन्हा विवाह करु शकत नाही. ती त्याला शरीसंबंधासाठी चालेल पण उजळ माथ्याने पत्नी म्हणून मिरवायला नाही. त्यानंतर हेमाला हवा असलेला समंजस पुरूष राजन जावळेच्या रूपाने मिळतो. परंतु तो तिचाच सेक्रेटरी असल्यामुळे यावलकरांच्या दृष्टीने दुय्यम. तो पुरुष खरा पण यावलकरांच्या मुलीशी स्वत:ला जोडून घेऊ शकेल इतकी त्याची लायकी नाही. हे जगाला समजले तर यावलकरांचे नाक कापले जाईल अशी त्यांची धारणा. त्यांना ठाकूर घराण्यातील अजित सिन्हा चालेल किंवा आमदार असलेला विक्रम चालेल, पण सेक्रेटरी असलेला राजन चालणार नाही. राजनचा हा मोठा गुन्हा ठरतो. म्हणून त्याला कायमचे संपवले जाते. ही पुरूष असलेल्या आणि पाताळयंत्री यावलकरांची सरंजामी कृती हेमाला पूर्णत: ओरबाडून काढते. अशा वेदनादायी अनुभवातून जात असताना हेमा मंत्री म्हणून स्वत:ला या राजकारणात मिरवतेय.

शैला समाजाच्या प्राथमिक पातळीवरील. कांचनच्या रुपाने तिला शहरात, श्रीमंत घरात, उंची जीवनात आणि प्रामुख्याने नव्या जगात प्रवेश मिळतो. तिचे या पूर्वीचे जग हे निरागस, नैतिक अधिष्ठानाचे आणि मानवीयतेचे. हाच चष्मा घालून ती देशमुखांच्या वाड्यात वावरते. पण हा वाडा तिच्याकडे एक सावज म्हणून पाहतोय हे तिच्या गावीही नाही. ती देशमुखांची सून होण्याची स्वप्ने पाहतेय आणि कांचन आपल्या मुलाच्या आउटलेटची सोय म्हणून. गुणाकार उपभोगण्याची वस्तू म्हणून, तर नागनाथराव आपल्या राजकरणासाठीचे साधन म्हणून. शैला कांचनशी आपल्या हक्काविषयी बोलू लागते, तेव्हा कांचनला तो तिचा मोठा अपराध वाटतो. ती देशमुखांची कशी बरोबरी करु शकेल ? त्यामुळे तिने देशमुख घरात मोलकरीण म्हणून राहण्याचीही योग्यता गामावली. तिला तिच्या हक्काची जाणीव झाली हे कांचनला कळते आणि हे जगाला कळले, तर देशमुखांची इज्जत जाईल, या भीतीने कांचन तिचा वेळीच काटा काढते. शुभदा ही ब्राह्मण घरातील. मध्यमवर्गीय पण उच्च जातीतील. देखणी, हुशार, सर्वगुण संपन्न आणि गुणाकारची वर्ग मैत्रीण. नैसर्गिकरित्या त्याचा तिच्यावर जीव जडतो. शुभदा किंवा तिच्या घरचे मात्र त्यासाठी तयार नाहीत. मुलाचे मन दुखावले जाऊ नये म्हणून कांचन मध्यस्ती करते. शुभदेला सून करुन घेण्याचा शब्दही देते. परंतु जेव्हा प्रिया गौड कांचनला दिसू लागते, तेव्हा शैलापुढे शुभदा त्यांना बिनमहत्त्वाची वाटू लागते. प्रिया गौडचा

आपल्या राजकारणासाठी उपयोग होईल तसा मध्यवर्गीय, ब्राह्मण घरातील शुभदेचा काय फायदा? या विचाराने शुभदेला वाऱ्यावर सोडून दिले जाते. आणि प्रिया गौडला सून करुन आणले जाते.

मृणाल ही सर्वाधिक भरकटत गेलेली स्त्री आहे. त्याला जशी परिस्थिती कारणीभूत आहे, तसा तिचा विवेकहीन स्वभावही कारणीभूत आहे. ती स्वतंत्र विचारांची, मुक्त वातावरणातील आणि उच्चशिक्षित. जीवनाबद्दलची असोशी तिच्यात पुरेपुर भरलेली. कला-साहित्याची तिला आवड. श्रीनिवास सारख्या गुणसंपन्न तरुणाच्या प्रेमात पडून, त्याच्याशी संसारही सुरु करते. मात्र श्रीनिवासच्या जीवनाचे उद्दिष्ट अगदीच भिन्न. त्याला मृणाला हवी आहे. ती केवळ उपभोगासाठी. वंशवाढीसाठी नाही. याउलट मृणालला बीजातून अंकुरणाऱ्या कोवळ्या कोभांचे अधिक आकर्षण. श्रीनिवास आणि मृणाल या विसंगत तत्वांवर अडून बसलेले. श्रीनिवास समाजसेवक असला तरी, तो पुरुष. आणि तो स्त्रीकडे याच दृष्टीने पाहतो. त्याला समाजसेवेचा बुरखा पांघरुन स्त्रीचा उपभोगही घ्यायचाय आणि त्याचवेळी पितृत्वही टाळायचे. त्याच्या दुटप्पीपणापुढे मृणाल मोडून पडते. या त्याच्या दुटप्पी भूमिकेनेच ती चिडून उठली असणारं ! आणि त्याला प्रतिक्रिया देण्यासाठी कृतीशील झाली असेल काय? असा प्रश्न उभा राहतो. कादंबरीतील मृणाल ही व्यक्तीरेखा इतर स्त्रियांच्या तुलनेत आपले अस्तित्व ज्या अर्थाने अधोरेखित करते, ते बारकाईने तपासले पाहिजे.

रवींद्र शोभणे यांना मोठ्या व्यापक पटाचा अन्वयार्थ लावायचा आहे. काळ या विस्तृत पटावरील मानवी जीवनाचे जे विशाल चलनवलन चालू आहे, ते त्यांना तपासायचे. स्त्री शिक्षणाला गेल्या दोनशेवर्षापासून सुरुवात झाली. ज्ञानाच्या अमृत स्पर्शाने स्त्रीला हळू हळू स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागली. पुरुषी व्यवस्था आणि स्त्री यातील अंतर लक्षात येऊ लागले. तरीही समाजात सर्वकष परिवर्तन होत असतेच असे नाही. परिवर्तनाचे अग्रटोक चिंचोळे, विस्मयकारक आणि अनपेक्षित असते. त्यावर समाजात व्यापक क्रियाप्रक्रियाही उमटत असतात. पण हळूहळू त्याचीही स्वीकारार्हता होऊ लागते. अर्थात त्याचे बसणारे धक्के समाज नाखुशीनेच सहन करीत असतो. मृणाल या पुरूषी समाजव्यवस्थेला असे धक्के देत असली पाहिजे. पुरुषाला उपभोगण्यासाठी स्त्री हवी, ही रुढ सामाजिक मानसिकता. त्याला मृणाला जोरदार आघात करतेय का ? की नवी व्यवस्था स्थापित करण्याची चिंचोळी पण टोकदार कृती एकांड्या शिलेदाराप्रमाणे आरंभिते हेही काळच ठरवेल. पण शोभणेंनी हे टोक दाखविण्याची जी मर्मदृष्टी दाखविली ती अधिक विशेष.

श्रीनिवास बरोबरच्या या अनुभवाने मृणाल अधिक बेभान होते. आपल्यावरील सारे दबाव झुगारुन समाज, संस्कार, परंपरा, रुढी यांना आव्हान देऊन नैसर्गिक तत्वांनुसार पुढची वाट चालू लागते. मग तिच्या आयुष्यात एका मागोमाग अनेक पुरुष येतात आणि जातात. प्रत्येकासमोर ती स्व:चे आव्हान उभे करीत राहते. स्वत:मधील आव्हान देण्याच्या क्षमेतने अधिकाधिक फुत्कार टाकीत जाते. अरुण जाधव, इंदर पटनाईक, के. राजू, सुजित पाटील हे सारे पुरुष नतमस्तक होताहेत असे तिला वाटत राहते, तेव्हा तिला जिंकल्याचा आनंद होतो. के. राजू किंवा इंदर पटनाईकपुढे नग्न होताना हे कलाकार आपल्यातील आव्हानक्षमतेपुढे झुकल्याचा तिला आनंद होतो. परंतु जेव्हा त्यांच्यातील पुरुषत्व जागे होत नाही, तेव्हा आपल्यातील आव्हान संपले की काय ? असा तिला प्रश्न पडतो. इंग्रजी मासिकाच्या मुखपृष्ठावर तिचे न्यूड फोटो छापले जातात, तेव्हा अनेक संस्कृती रक्षकांचे तिला फोन येतात, पण असे फोन आले नसते तर ? येतात हे तिच्या जिंकण्याची खूण. ती मात्र त्या जगात नसल्यासारखी.

तिला घर-संसार हवा आहे, पण नेमके तेच नाकारणा-या पुरुषाबद्दल तिच्या मनात घृणा आहे. पुरुष आपल्याला नाकारतोय या वास्तवापेक्षा आपणच पुरुषाचं अस्तित्व आणि त्याची व्यवस्था नाकारली पाहिजे, या भूमिकेत ती कृतीशील होते. श्रीनिवास ते डॉ. पठारे या दोन टोकांमधील तिचा प्रवास यादृष्टीने पाहण्यासारखा आहे. डॉ. पठारेंच्या निमित्ताने ती पुन्हा मैत्रीणींच्या आग्रहावरुन सांसारिक जीवनात येण्याचा प्रयत्न करुन पाहते, पण त्यातील विसविशीतपणा तिला किळसवाणा वाटतो. पुन्हा त्या जुनाट व्यवस्थेत जाण्यास नकार देतो. तिला भोगण्यासाठी येणारा पुरुष तिला नको आहे. तर तिला उपभोगण्यासाठीचा पुरुष तिला हवा आहे. डॉ. पठारेंना ती त्यामुळेच नकारते.

खेरीज तिच्या मानसिकतेत आणि वर्तमान वास्तवात महदअंतर आहे. वर्तमान व्यवस्था ही अजूनही पूर्णत: पुरुषी. ही सत्ता जशी स्त्रियांवर तशी पुरुषांवरही आहे. कांचन, प्रेरणाताई, प्रमिलाताई, अमृता या स्त्रिया त्याच्याच निदर्शक. गायत्री या व्यवस्थेतून बाहेर पडण्याचा असफल प्रयत्न करुन पाहते, मृणालचा प्रवास तिच्यापेक्षा अधिक पुढच्या दालनातील, परंतु एकटीचाच. कारण ही व्यवस्था तेवढ्यापुरती अजुनही स्थितीशीलच. मृणालला उपभोगण्यासाठी तिच्या भोवती पुरुष जमा होतात. मुक्त संचार करण्यासाठी मृणालसारखी स्त्री उपलब्ध असेल तर अशा पुरुषांसाठी ती पर्वणीच. मृणालकडे लोक भरकटलेली स्त्री म्हणून पाहतात. तिला पुन्हा पुरुषी व्यवस्थेतल्या कुटुंब व्यवस्थेत आणण्याचा प्रयत्नही करुन पाहतात. परंतु येथे कोणत्याही पुरुषाला भरकटलेले पुरुष म्हणून संबोधले जात नाही. श्रीनिवासला मृणालने सोडले किंवा के. राजू, इंदर पटनाईक, सुजित पाटील यांचे अनेक स्त्रियांबरोबर संबंध आहेत, म्हणून त्यांना कोणीही बहिष्कृत करीत नाही. याउलट ते प्रतिष्ठेते मिरवतात. के. राजू किंवा इंदर आपल्या कलेच्या बुरख्याखाली स्त्रिला उपभोगण्यासाठी आसूसलेले. भले त्यासाठी मृणालला ते

पुढाकार घ्यायला लावत असतील, पण तोही त्यांच्या डावपेचाच भाग असतो. मृणाल सारखी स्त्री त्यात अलगद फसवली जाते. भोवतीचे वर्तमान वास्तव अजून बदललेले नाही, हे मृणालच्या अजूनही ध्यानी आलेले नाही. ती म्हणते ''एका सुसंस्कारित घरातली, सभ्य वातावरणातली, सर्वसामान्यात हुशार म्हणून गणली गेलेली मुलगी का अशी मधल्या धारेला लागली, हा प्रश्न आपल्या ओळखीतल्या साऱ्यांनाच पडत असेल आपल्यासारखा ? पण त्या प्रश्नाचं उत्तर कोणाजवळ आहे ? आपल्याजवळ तरी आहे ? खरं तर आपल्याला चारचौघींसारखा संसार करायचा होता. नवरा मुलंबाळ यात रमायचं होतं. श्रीनिवासनं संसारापर्यंत नेलं; पण आपत्यसुखापासून दूर ठेवण्याच्या त्याच्या अट्टहासापोटी आपली अशी फरपट झाली. आपल्यातल्या सृजनतेलाच त्याचा विरोध होता. झाडाला खतपाणी घालायचं. मशागत करायची; पण त्याला कोंब फुटला की तो खुडून टाकायचा. कोण कोणाला समजून घेऊ शकलं नाही ? आापल्या तो की त्याला आपण ? (पृ. ३१७) जीवनाबद्दलच्या अपेक्षांचा भ्रमनिरास झाल्यानंतर ती मनाने मोडून पडते आणि निरुद्देश, बेफिकीरपणे वाहत जाते. वस्तुत: प्राचार्य अनंतराव देशपांडे सारख्या विद्वान, सत्शील उच्चविद्याभूषित पित्याच्या संस्कारात वाढूनही तिचे जीवन रूढ अर्थाने भरकटत जाते असे म्हणावे का ?

।।६।।

१९७५ नंतर भारतीय समाज कूस बदलू लागला. १९९१ ला रशियाचा पाडाव होऊन साम्यवादी समाजरचनेचा अस्त झाला आणि अमेरिकेच्या रुपाने भांडवलशाही देशाची एकतर्फी पकड जगावर बसू लागली. भारत हा मिश्र अर्थव्यवस्थेला प्राधान्य देणारा देशही, अमेरिकेच्या प्रभावखाली निघाल्याचे दिसू लागले. या घटनांच्या पार्श्वभूमीवर देशातील घडामोडी या कादंबरीमध्ये आहेत. 'खाउजा' या तत्वाचा जो अधिक जोरदार प्रचार–प्रसार पुढे सुरु झाला, त्याच्यासाठी अनुकुल परिस्थिती भारतीय समाजमध्ये या काळात दिसू लागल्याची जी चिन्हे आहेत ती या कादंबरीचे मूलद्रव्य. प्रामुख्याने कोणताही समाज हा त्या–त्या काळात कोणत्या मूल्यांच्या आधारे उभा आहे, हे पाहिले जाते. हा काळ अशा मूल्यहिनतेच्या प्रक्रियेचा म्हणता येईल. सामाजका रण, राजकारण, संस्कृती, धर्म, व्यवहार आणि व्यक्तिगत अशा सर्व पातळ्यांवर अशी मूल्यहीनतेची प्रवृत्ती बळावू लागल्याचे दिसते. आण्णाजी, आबा शिराळे, प्राचार्य अनंत देशपांडे, श्रीनिवास बनकर त्यांची अवस्था ही समाजात अवघडून बदल्यासारखी. आण्णाजी देशमुख आता कृतीशील जीवनातून निवृत्त आहेत. त्यांच्या विचारांची वाट त्यांच्या मुलानेच सोडून दिलीय, हे आण्णांना सहन होत नाही आणि ते त्या विरुद्ध आवाजही उठवू शकत नाही. या उलट आण्णांचे असे वागणे हे नागनाथरावांना जुन्या पिढीचा प्रॉब्लेम वाटतो. ते ज्याचा आग्रह धरतात ते अप्रस्तूत वाटते. शिक्षक भरतीत भ्रष्टाचार करणे, कोवळ्या मुलींच्या स्वप्नांशी खेळणे आणि आपल्या राजकारणासाठी कोणत्याही पातळीवर जाणे याबद्दल त्यांना कोणतीही खंत वाटत नाही.

तीच बाब पत्रकारीतेतील. समाजातील अन्यायाला वाचा फोडण्याचे माध्यम असलेले हे माध्यम पैशाच्या बदल्यात न्याय दडपण्यास प्राथमिकता देते. पत्रकाराचे मुख्य कर्तव्य बातमी देण्याचे पण ते दुय्यम ठरवून बातमी न देण्याचेपैसे वसूल केले जातात. सत्य उघड करणे हे मूल्य महत्वाचे नसून पैसा मिळविणे याला अधिक महत्व आल्याचे हे निदर्शक. समाजात शिक्षणाचा प्रसार करायचाय, तर त्यासाठी फक्त देखावा करा. शिक्षकांचे पगार परस्पर हडप करा. कोणी त्याविरुद्ध आवाज उठवीत असेल तर, त्यालाच जीवनातून उठवा. वरुन लोककल्याणाच्या झुली पांधरा आणि त्याच्या आड मुजोरपणे संगीता काळभोर सारख्या प्राध्यापक स्त्रीचे लैंगिक शोषण करा. शिक्षणासारख्या क्षेत्रात फोडा आणि झोडा या न्यायाने राज्य करा. कुणी संघटित होत असेल तर त्यांना एकटे पाडा. त्याला बळी द्या. हे सत्ताधाऱ्यांचे धोरण तर ज्ञानाची, क्रांतीची, संस्काराची, लोकशाहीची भाषणे करीत सामान्यांनी आपमतलबी होऊन शेपूट घालून घरात गुमान राहा. सत्ताधीशांची मुजोरी आणि शिक्षितांचे कातडी बचाऊ धोरण दोन्हीही समाजाला वेढीस धरणारेच. त्यामुळे उमेश जाधव, अरुण जाधव सारख्या सरंजामी सत्ताधीशांची जेवढी मूल्यहीनता दिसून येते, तेव्हढीच फुटीर प्राध्यापकाची भूमिका आपल्या आवाजाशी प्रतारणा करणारी आहे. शिक्षकी पेशावर त्यांची निष्ठा नसून त्यातून मिळणाऱ्या फक्त पैशावरच आहे. त्यामुळे शिक्षकांच्या पैशावर डोळा ठेवणारा उमेश जाधव आणि केवळ पगारासाठी शिक्षकी पेशा स्वीकारलेले प्राध्यापक हे एकाच माळेचे मणी ठरतात. उमेश जाधवला स्वत:च्या कर्तव्याचा विसर पडला असा आरोप करताना, शिक्षकही आपल्या ज्ञाननिष्ठेवर कुठे आढळ आहेत ?

बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून आलेल्या आणि न्यायाची भाषा करणारा अर्जून आपल्याच पत्नीवर अन्याय करतो. त्याला आंबेडकरांच्या विचारांचा विसर पडलाय. साहित्यादी कला समाजाच्या विधायक परिवर्तनात भूमिका बजावतात. या आंबेडकर–मार्क्सच्या तत्वज्ञानाचे संजीवन पिलेल्या अर्जुनला सत्ताप्राप्ती झाल्यानंतर साहित्यादी गोष्टी भिकारचोट वाटतात. त्यामुळे समतेची भाषा करणारा अर्जून सरंजामी भाषा बोलू लागतो, सत्तेतून पैसा, प्रतिष्ठा आणि पुन्हा निरंकुशता टिकवून ठेवणे हेच सत्ताधाऱ्यांचे मुख्य उद्दिष्ट. त्यामुळे समता, न्याय, समुहभावना, मानवता ही मूल्ये कितीतरी दुय्यम ठरतात. त्यातही सत्तेची सतत उब हवी. यासाठी मूल्यहीन तडजोडी करणे कोणालाच गैर वाटत नाही. कॉंग्रेस पक्षातून तिकीट मिळत नसेल तर बंडखोरी

करा. पण सत्ता हस्तगत केलीच पाहिजे. तेवढे करुनही शक्य होत नसेल तर पक्षच बदला. अशावेळी आपण आपल्याच आतल्या आवाजाशी आणि आपल्या मूलभूत तत्वांशी प्रतारणा करतोय याचा विसर पडतो. त्याही पुढे जाऊन पैशासाठी आपण आत्मघात करतोय हेही लक्षात येत नाही. राजकारणाच्या सारीपाटावर सतत तेवत राहायचे, तर अमानूष खेळ खेळता आले पाहिजे. यावलकर यात माहीर. त्यात अर्जुन वाघ सारख्या नवख्या तरुणाचा बळी जात असला, तरी हरकत नाही. दिलेला शब्द पाळलाच पाहिजे असे नाही. मिळवणे एवढे एकच ध्येय. कोणाचीही निरागसता आपल्या गरजा भागविण्याची त्यांना संधी वाटते. स्वत:च्या प्रतिष्ठेपुढे निरागस लोकाचे जीवन नगण्य ठरते. त्याचा अर्जून किंवा राजन जावळे होतो. शिक्षणासारखा पवित्र क्षेत्रात वावरणारा नारायण जोशीसारखा ज्येष्ठ माणूस गायत्रीपुढे आपल्यातील स्त्रैणता सिद्ध करतो. या आणि इतरही अनेक घटना कादंबरीत मूल्यहीनतेच्या आणि राजकीय प्रभावाच्या निदर्शक आहेत.

याच काळातील आण्णाजी देशमुख, आबा शिरोळे, प्राचार्य देशपांडे या वयोवृद्ध झालेल्या व्यक्ती समाजाच्या दुय्यम स्थानी गेल्याचे दिसून येते. आपल्याच मुलाच्या – नातवाच्या अनैतिक कृत्यापुढे हतबल झालेले आण्णाजी मूग गिळून प्राचार्य देशपांडे आपल्या मुलीच्या वर्तनाने मनातून उद्धवस्त. आपण कृतीहीन झाल्यची भावना त्यांच्या पत्रलेखनातून दिसते. आपण आता मागे पडलोय, दुय्यम ठरलोय ही जाणीव वानप्रस्थाकडे मार्गस्त करणारी.

अश्वमेधच्या शेवटी आबा शिरोळे आणि अनंतराव देशपांडे एकमेकांशी पत्रव्यवहाराद्वारे संवाद करता करता सद्य परिस्थितीवर भाष्य करतात. ती बदललेल्या वर्तमनाविषयीची त्यांच्या मनातली वेदना. आपण जीवनभर ज्या मूल्यांसाठी झटलो, त्याची आता कुणालाच पत्रास उरलेली नाही. सारेच कसे असे भरकटल्यासारखे झाले ? जे योग्य आहे, सत्य आहे, सामाजिक कल्याणाचे आहे, त्याची पाठराखण करण्याऐवजी जे व्यवस्थेला सोईचे आहे, त्याची भलामण करण्याचा आग्रह धरला जातो. वर्तमानपत्राच्या मालकांना जे अनुकूल असेल, तेच छापा हे बंधन आबा शिरोळेंना म्हणूनच असह्य होते. संपादक म्हणून असलेल्या मूल्यनिष्ठेशी प्रतारणा होत असेल, तर केवळ बातम्यांचा रतीब कशासाठी घालायचा? ही त्यांची भूमिका. परंतु संपादकांची ही भूमिका मालकांना मंजूर नसेल तर ? संपादक हे जनतेशी जोडलेले तर मालक पैशाशी. त्यामुळे आबा शिरोळेंना पायउतार व्हायला लावून आपल्या मर्जीतील गजानन गद्रेसारख्या हुजऱ्या व्यक्तीला हे पद दिले जाणे सामाजिक व्याभिचाराचेच लक्षण. अशा व्यभिचारासाठी तयार नसलेले आणि आपल्या मूल्यनिष्ठेवर अडून बसलेले आबा शिरोळे एका बाजूला आणि अशा तडजोडीसाठी कायम तत्पर असलेले, तसेच मालकांची तळी उचलून धरण्यासाठी अधीर असलेले गजानन गद्रेंसारखे संपादक दुसऱ्या बाजूला. जीवनाच्या शाश्वत मूल्यांसाठी आग्रही असलेले देशपांडे–शिरोळे एका बाजूला आणि ही भूमिका आऊटडेटेड मानणारे दुसऱ्या बाजूला असे हे वर्तमान वास्तव. अर्थात शिरोळे–देशपांडे हे या काळातील अल्पसंख्य. त्यामुळे त्यांचा आवाज क्षीण झालेला. ते ज्याचा आग्रह धरीत आहे, ती विद्यमान व्यवस्थेच्या दृष्टीने किरकिर ठरते. आबा म्हणतात, ''शेवटी माणसाच्या मूलभूत गरजा कितीशा? माणूस संपून जातो, तरी गरजा संपत नाहीत. मग भौतिक गरजांसाठी आपण आपल्याला का असं संपवून टाकायचं? आपल्या गरजा पूर्ण करण्यापेक्षा त्या संपवण्यात जो पुरूषार्थ असतो तो अन्यत्र नसतो.'' (पृ. ६८०) पण हे तत्वज्ञान जुनाट ठरतेय. आजच्या पुरूषार्थाची व्याख्या त्यागाऐवजी उपभोगण्यात परावर्तीत झालीय ही या काळाची खूण.

भारतवर्षामध्ये भौतिक सुखाचा सोस कोणाला नव्हताच, असे नव्हे. किंवा सारा समाजच अध्यात्मिक प्रेरणांनी भारावला होती असेही नव्हे. परंतु वर्तमानकाळी यात प्रमाणाचा मोठा फरक दिसून येतो. समजाचा बहुसंख्य भाग जेव्हा भौतिक सुखाच्या मागे लागतो, तेव्हा माणसांमाणसांमध्ये जीवघेणी स्पर्धा लागते. तिथे केवळ व्यवहारवाद शिल्लक राहतो. मानवता, त्याग, अपरिग्रह, सहानुभाव समता, बंधुभाव, सभ्यता, अभिरुची संपन्नता या मूल्यांना तिलांजली दिली जाते. आणि स्वार्थ, चंगळवाद, सुखोपभोगाची लालसा, कमालीचे एकारलेपण, व्यक्ती केंद्रितता, ओरबाडणे, अभिरुचीहीनता, रासवटपणा यांच्या आधीन समाज होतो. शिरोळे– देशपांडे, देशमुख यांच्या पिढीला हे सारे लक्षात आले आहे. त्यांची व्यथा आहे, ती ही की या नव्या पिढीच्या हे का लक्षात येत नाही. त्यासाठी ते मनात अस्वस्थता घेऊन जगताहेत. सहन होत नाही म्हणून सहधर्मा असलेल्यांशी संवाद करतात. गुणाकार हा युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो. यातूनच ज्या काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्याची चळवळ चालविली तोच पक्ष स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षानंतर कोणत्या तरूण नेत्यांच्या हातात चालला आहे, हे लक्षात घेण्यासारखे. त्यामुळे आण्णाजी आणि नागनाथराव यांच्यामध्ये असलेल्या अंतराचा गुणाकार, गुणाकार करणार हे नक्की.

या व्यवहारवादाच्या मागे लागलेले यावलकर, अर्जून वाघ, नागनाथराव, मृणाल आपल्या भौतिक सुखोपभोगाचा वेग पकडून आहेत. त्याचा शेवट कशात होणार हे शिरोळे आणि देशपांडे यांच्या पत्रव्यवहारातून वाचकांच्याही लक्षात येते. मृणाल हे त्याचे उत्तम उदाहरण. म्हणूनच हे सारे एका बाजूला आणि शिरोळे–देशपांडे किंवा श्रीनिवास बनकर एका बाजूला. समाजाचा व्यापक असा समुह जेव्हा भौतिक मूल्यांच्या आधीन होते, तेव्हा समाजात एक प्रकारचे आवर्त निर्माण होते. त्याची परिणती अशा इंदिरा गांधी आणि राजीव गांधीसारख्या पंतप्रधानाच्या हत्येसारख्या घटनेत होते. पण तो त्याचा शेवट नसतो. ती आणखी नव्या आवर्ताची आणि अशाश्वत जीवनाची सुरूवात असते. त्यासाठीच शाश्वत मूल्यांची आराधना केली पाहिजे, हे शिरोळे–

देशपांडेंच्या पिढीला म्हणायचे आहे. मात्र या आवर्तत सध्यातरी त्यांचा आवाज क्षीण झालेला आहे, हे वर्तमानकाळाचे कटू वास्तव.

मूल्यात्मकतेचे संचित असे कुंठीत झाल्यामुळे जीवनाच्या चलन–वलनातून आपण हद्दपार होऊ लागल्याची ठणकणारी जाणीव कोणत्याही भल्या माणसाला या कादंबरीतून झाल्यावाचून राहत नाही. लेखकालाही हीच जाणीव वाचकांना प्रतित करायची आहे. त्याचे प्रतिध्वनी या कादंबरीच्या वाचनाने प्रत्येक वाचकाच्या मनात उमटत राहतात, हे या महाकादंबरीचे यश.

संदर्भ ग्रंथ

०१. अश्वमेध : रवींद्र शोभणे, मॅजेस्टीक प्रकाशन, मुबंई. प.आ. २०१४
०२. सत्यापासून साहित्यापर्यंत : संपा. वंदना महाजन, विजय प्रकाशन, नागपूर, प. आ. २०१५
०३. गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी: संपा. विलास खोले, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई २००२
०४. ललित : अरुण साधूविशेषांक, फेब्रु. २००७.